# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.३०५२-ब/२०२२/अ.क्र.४४२४/२०२६

श्री. शांताराम एन. पाटील
फ्लॅट नं.३०, प्रियंका अपार्टमेंट ब,
वावरेनगर, आय.टी.आय.अंबड लिंक रोड,
कामटवाडा शिवार, नाशिक-०८.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक विकास विभाग चाळी,
बी.डी.डी. चाळ क्र. ५१, जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक विकास विभाग चाळी,
बी.डी.डी. चाळ क्र. ५१, जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०२.२०२२ | -- | १४.०३.२०२२ | -- |

अपिलार्थीनी दिनांक ०४/०२/२०२२ रोजी सन २०२० ते ०४/०२/२०२२ रोजी पर्यंत व्यवस्थापक, विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई येथील शाखा अभियंता निहाय विविध लेखाशीर्ष निहाय देखभाल, दुरुस्तीच्या झालेल्या, प्रगतीत असलेल्या कामांची माहिती मागितली असून माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक १४/०३/२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज व दिनांक ०७/०७/२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. तसेच हायब्रीड अथवा ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहण्याची सुविधा असतानाही ते उपस्थित नाहीत. ही बाब लक्षात घेता अपिलार्थींना त्यांच्या दिनांक ०४/०२/२०२२ रोजीच्या मूळ माहिती अर्जातील माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल क्र.४४२४/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**

**मुंबई** — **( राहुल भा.पांडे )**
**दिनांक : ०१-०६-२०२६** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Jyotsna